भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500 FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA 6985 500 © 2018 © 20/6/2019 AN 458879

बेरोजगारांची नवकिरण नागरिक सेवा सहकारी संस्थे के द्वारे जगदीश ...

संजय विष्णुपंत देशमुख
मुद्रांक विक्रेता ला.क्र. 3/99८६
तहसिल कार्यालय, अमरावती

29 JUN 2019

# करारनामा

हा करारनामा अमरावती येथे आज दि. 28/06/2019 रोजी खालीलप्रमाणे दोघांमध्ये करण्यात आलेला आहे.

पार्टी नं.१ – संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती. तर्फे कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

पार्टी नं.२ (कंत्राटदार) – पुर्ण नांव –बे. नवकिरण नागरीक सेवा सहकारी संस्थे तर्फे संजय भगवान माहुलकर,वय – ४७वर्षे, धंदा – बेरोजगार
पत्ता – रा. दुर्गा माता मंदिर, बेलपूरा, अमरावती.

ज्याअर्थी विद्यापीठातील रस्ते परिसर इमारती व स्वच्छता गृहाची कंत्राटी (ठेका) पध्दतीने स्वच्छता व साफसफाईचा करावयाची आहे.

आणि

ज्याअर्थी निविदे सोबतचे जोडपत्रातील स्वच्छता व साफसफाई बाबतच्या नमुद केलेल्या अटी व शर्ती अस्तित्वात आहे.

आणि

ज्याअर्थी, विद्यापिठाने त्यांचे कार्यालयीन आदेश क्र. संगाबाअवि-१/१३४/द्र-४६६/२०१९, ................. ............ दि. ३.६.२०१९... नुसार कामाचे विवरणमधील वार्षीक एकत्रीत रक्कम (दर) नुसार स्वच्छता व साफसफाईचा पार्टी नं.२ चा निविदा अर्ज स्विकृत केलेला आहे.

आणि

ज्याअर्थी, कंत्राट पार्टी नं.२ ला देण्यात आले आहे.

आणि

ज्याअर्थी कंत्राटदाराने स्वच्छता व साफसफाई कामात परिसरातील रस्ते, परिसर, शैक्षणिक विभाग, मुला-मुलींचे वसतीगृह, परीक्षक वसतीगृह आणि अतिथीगृह इ. इमारतीमधील साफसफाई तसेच या इमारतीमधील प्रसाधनगृह व शौचालय स्वच्छ करण्यासाठी करार करण्याचे मान्य केले आहे.

आणि

ज्याअर्थी, कंत्राटदाराचे सुरक्षा ठेव रू. १८६७३८/-.......... (अक्षरी एक लाख शहात्तर हजार सातशे अडोतीसरुपये रुपये फक्त ) विद्यापीठ खाती जमा केलेले आहे. त्याअर्थी, पार्टी नं.१ व पार्टी नं.२ निविदेसोबतच्या अटी व शर्तीनुसार वार्षिक एकत्रित रक्कम (दर) नूसार साफसफाई व स्वच्छता करण्याचे करारनामा लिहून देत आहे.

१) कंत्राटाचा कालावधी – कराराच्या तारखेपासून एक वर्षाकरिता, दि. १.८.२०१९ ते दि. 31/06/2020 पर्यंत राहिल.

२) कंत्राटदाराने त्यास प्राप्त झालेल्या नियुक्तपत्रातील सर्व अटी व शर्ती वाचल्या आहेत आणि त्या त्यांना कंत्राटदाराला समजल्या आहेत. त्या सर्व अटी व शर्ती कंत्राटदाराला मान्य आहेत.

३) जर कंत्राटदाराकडून एखाद्या अटी/शर्तीचा भंग झाला तर कंत्राटदार म्हणून झालेल्या करारनामा रद्द केला जाईल, याची कंत्राटदाराला जाणीव आहे.

४) कंत्राटदाराने यासंदर्भातील सर्व माहिती जाणून घेतल्यानंतर जाणीवपूर्वक व स्वेच्छेने सदर कंत्राटी काम स्वीकारत आहे.

५) या कंत्राटीकामानंतर कंत्राटदाराला व त्याच्या संस्थेला कायम स्वरूपी काम मिळण्याचा हक्क राहणार नाही. तसेच या करारनाम्याच्या कालावधीनंतर विद्यापीठावर कोणतीही जबाबदारी राहणार नाही व या कंत्राटसेवेशी निगडीत कोणत्याही प्रकारची मागणी कंत्राटदार वा त्याची संस्था करणार नाही. अशी या करारनाम्याद्वारे हमी देत आहे.

६) पार्टी नं.१ व पार्टी नं.२ रू.१००/- (अक्षरी शंभर फक्त) ने स्टॅम्पपेपरवर प्रतिज्ञालेख करून देण्याची हमी देतो.

७) कंत्राटाचे कालावधीचे दरम्यान कोणत्याही पध्दतची अडचण निर्माण झाल्यास त्यावर मा. कुलगुरूच्या लवादाने दिलेला निर्णय हा अंतिम समजण्यात येईल.

८) या नियमासाठी निर्माण होणारे सर्व लवाद हे न्यायिक व सलोखा कायदा (**Arbicration & conciliation act.**) च्या तरतुदीअंतर्गत निकाली काढले जातील व सर्व प्रकारच्या विवादाचे निराकरण अमरावती न्यायालयाचे कक्षेअंतर्गत राहील.

९) कंत्राटदाराचे कामकाज असमाधानकारक आढळून आल्यास त्याची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल. याबद्दल कंत्राटदाराची कुठलिही तक्रार राहणार नाही.

१०) कंत्राटदाराने प्रती दिवस मनुष्यबळ संख्या किमान ४५ आणि प्रती दिवसकिमान ३२० मनुष्य तास (**Man Hours**) यानुसार काम करावे लागेल.

११) पार्टी नं.२ (कंत्राटदार) यांनी सोबत जोडलेल्या अटी व शर्तीचे पालन न केल्यास अथवा त्याचे पालन करण्यास ते असमर्थ ठरल्यास कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करण्याचे अधिकार पार्टी नं.१ यानी राखून ठेवले आहे.

पार्टी नं.१ व पार्टी नं.२ ह्यांनी या करारनाम्यातील सर्व परिच्छेद आणि निविदेसोबतच्या अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचून व समजून घेवून करार मान्य केल्याबाबत करारनाम्यावर स्वाक्षरी करीत आहोत.

अमरावती.
दिनांक : 28.6.2019

24/7/19
..................................
पार्टी नं.१ – कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

..................................
पार्टी नं.२ – कंत्राटदार

अध्यक्ष / सचिव
सुशिक्षित बेरोजगारांची नवकीरण
नागरीक सहकारी संस्था मर्या.
अमरावती. र.नं. ७४३/१०

साक्षीदार :

१) ..................................

२) ..................................

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

क्र.संगाबाअवि/१/१३७/४- 271 /२०२०
दिनांक – २३.७.२०२० 27

प्रति,

अध्यक्ष,
नवकिरण नागरीक सेवा सहकारी संस्था,
दूर्गा मंदिराजवळ, बेलपूरा,
अमरावती

**विषय – विद्यापीठ परिसरातील स्वच्छता व साफसफाईच्या कंत्राटास मुदतवाढ देण्याबाबत...**

संदर्भ – विद्यापीठ (कार्यादेश) पत्र क्र.संगाबाअवि/१/१३७/ए-९८४/२०२०, दि.२४.७.२०१९.

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित पत्रान्वये विद्यापीठ परिसरातील स्वच्छता व साफसफाई करण्याकरीता दि.१.८.२०१९ ते ३१.७.२०२० या एक वर्ष कालावधीकरीता आपल्या संस्थेसोबत करारनामा करण्यात आलेला आहे. संदर करार दि.३१.७.२०२० रोजी संपुष्टात येत आहे.

तथापि, नविन कंत्राटदार संस्थेची नियुक्ती होईपर्यंत अथवा पुढील आदेशापर्यंत पुर्वीच्याच करारनाम्याप्रमाणे तसेच अटी व शर्ती आणि दराचे अधिन राहून आपल्या संस्थेस दि. १.८.२०२० पासून मुदतवाढ देण्यात येत आहे.

आपला,

(डॉ.तुषार देशमुख)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रत- १ वित्त व लेखा अधिकारी , संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
२.प्र.सुरक्षा अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.